**<u>नि.दिवाणी दावा क्रं.९७/२०१६</u>**
**<u>नि. क्रं.३४ लगत.</u>**

## :: वादी पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर पुढील सरतपास ::

आता मला खरेदीखत क्र.१८२४/१९९४ ची प्रमाणित प्रत दाखविली. (अर्ज निशाणी ३८ वरील आदेशाप्रमाणे वादीला सदर खरेदीखताचा दुय्यम पुरावा नोंदविण्याची परवानगी दिली आहे. तसेच सदर खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखल आहे. ती खाजगी कामाच्या अनुषंगाने कार्यालयाला बाळगलेली प्रत आहे. त्याकरिता भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ७४ हे मदत करणारे आहे. भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ७८ प्रमाणे सार्वजनिक अभिलेखाच्या प्रमाणित प्रतीसंबंधी गृहीतक दिलेले आहे. ते येथे लागू पडते. त्याप्रमाणे सदर प्रमाणित प्रतीला निशाणी देणे योग्य आहे. त्यास निशाणी ४९ देण्यात येते.)

सरतपास पूर्ण.

## :: प्रतिवादी क्र.१ करिता उलटतपास विधीज्ञ श्री. एस.बी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू ::

२. भूमापन क्र.१३७ चे एकूण क्षेत्रफळ १२हे.३१आर होते आणि ते माझ्या मालकीचे होते. याव्यतिरिक्त माझ्याकडे इतर जमिनी आहेत. मला दहा हजार रुपयाची गरज होती त्यामुळे मी प्रतिवादी क्र.३ ला सदर रकमेची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ हा वर्ष १९८७ मध्ये वीस वर्षाचा होता आणि शिक्षण घेत होता. वर्ष १९८७ च्या व्यवहाराबाबत माझी प्रतिवादी क्र.३ रतीकांतचे वडील मधुकर चिद्रेसोबत बोलणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी वर्ष १९८७ मध्ये प्रतिवादी क्र.३ ला वाद जमिनीचे खरेदीपत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत माझ्या आणि प्रतिवादी क्र.३ च्या संमतीने झाले होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे क्र.१३७ मधील क्षेत्रफळ १हे.२०आर हे बाबुराव दिगंबर सगर, क्षेत्रफळ २हे.२आर हे उत्तम पंढरीनाथ वट्टमवार, क्षेत्रफळ २हे.२आर हे प्रदिप दिलीपराव आणि क्षेत्रफळ १हे.२१आर हे प्रशांत कल्याणराव वलांडे यांना खरेदीपत्राने विकलेले आहे.

प्रश्न – तुम्ही सदर ईसमांना खरेदीपत्र दिले होते काय ?

उत्तर – मी सदर ईसमांना मुदत खरेदीपत्र करून दिले होते.

४. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ला वर्ष १९८७ मध्ये नाममात्र खरेदीपत्र करून दिल्याचे खोटे सांगितले. नाममात्र खरेदीपत्र असल्याबाबत मी लिहून घेतलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर खरेदीपत्राच्या दिवशी प्रतिवादी क्र.३ ला जमिनीचा ताबा दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्राचा महसूल दप्तरी फेरफार झालेला आहे. मी सदर फेरफारला हरकत घेतली होती. त्याप्रमाणे तहसीलदाराने स्थळ निरीक्षण केले आणि फेरफार मंजूर केला. माझी दावा मिळकतीमध्ये वहिवाट असल्याबाबत आणि त्याची नोंद घेण्याबाबत मी तहसीलदारांकडे अर्ज केला होता. त्या वेळी तहसीलदार हे स्थळ निरीक्षणाकरिता आले होते. हे मला माहिती नाही की, तहसीलदारांनी माझा अर्ज नामंजूर केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वर्ष १९८७ पासून १९९४ पर्यंत प्रतिवादी क्र.३ च्या ताब्यात वाद मिळकत होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ ला पैशाची गरज होती व त्याने वर्ष १९९४ मध्ये रु.५३,०००/– च्या मोबदल्यात वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ ला विकली. प्रतिवादी क्र.१ ने सदर खरेदीखताचा फेरफार करून घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा वाद मिळकतीमधून दरवर्षी मालक म्हणून पिक घेतो

आणि त्याच्या ताब्यात वाद मिळकत आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा परमेश्वर याने माझ्याविरुध्द वाटपाकरिता नि.दि.दा.क्र.४१४/२००० दाखल केला होता आणि त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व ३ आणि इतर खरेदीदार हे पक्षकार होते. सदर दावा नामंजूर झाला होता. त्याविरुध्द मी अपील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वर्ष १९८७ मध्ये प्रतिवादी क्र.३ ला दोन अटीवर खरेदीखत करून दिल्याबाबत खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, दहा हजार रुपये पंधरा दिवसामध्ये परत देण्याचे ठरले होते हे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ हा सावकारीचा व्यवसाय करतो हे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ने मला पैसे मागितल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ने माझ्या मदतीने प्रतिवादी क्र.१ ला वाद मिळकतीचे खरेदीपत्र दिल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा मेव्हणा प्रतिवादी क्र.२ याला पैशाची मागणी केली आणि त्याने प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदीपत्र करून देण्याबाबत मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्यातील खरेदीच्या व्यवहाराला हजर नव्हतो व माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी क्र.१ च्या खरेदीपत्रावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामधील परिच्छेद क्र.१ व २ मधील मजकूर खोटा कथन केला.

६. मी प्रतिवादी क्र.१ ला दर गुडीपाडव्याला पाच हजार रुपये दिल्याबाबत माझ्याकडे पावत्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१२/०२/२०१५ रोजी प्रतिवादी क्र.१ ला खरेदीपत्र परत करण्याची

विनंती केल्याचे मी खोटे सांगितले. मी प्रतिवादी क्र.१ ला खरेदीपत्र परत करून देण्याच्या संबंधाने नोटीस करून दिलेली नाही. मी प्रतिवादी क्र.२ ला रु.३३,०००/– दिल्याबाबत माझ्याकडे पावती नाही. मला सदर पावती घेण्याची आवश्यकता वाटली नाही कारण प्रतिवादी क्र.२ हा माझ्या बायकोचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ चा प्रतिवादी क्र.१ च्या खरेदी व्यवहाराशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासाच्या शपथपत्रामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, मी विकलेली जमीन परत मिळविण्यासाठी खोटा दावा केला आणि खोटी साक्ष दिली.

प्रश्न – तुम्ही वर्ष १९८७ पासून २०१७ पर्यंत सदर खरेदीपत्र परत का घेतले नाही .

उत्तर – मजबुरीमुळे म्हणजे पैसे नसल्यामुळे मी सदर खरेदीपत्र पलटून घेतले नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**प्रतिवादी क्र.२ व ३ विरुध्द दावा एकतर्फा चालल्याने उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत        सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )        ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.    दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. ०७/०८/२०२५.